दै. सकाळ दि. 01.01.2025

# सुधीर खोडवे यांच्या कर्तृत्वाचा झाला सन्मान

**नांदेड, ता. ३१ :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, पोलिस अधीक्षक कार्यालयात कार्यरत सहायक पोलिस उपनिरीक्षक सुधीर भालचंद्र खोडवे यांनी अद्वितीय साहस दाखवत पेटलेल्या वाहनाची आग विझवून मोठा अनर्थ टाळला. त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी त्यांचा बक्षीस व प्रशस्तिपत्र देऊन सन्मान केला.



**नांदेड :** सहायक पोलिस उपनिरीक्षक सुधीर खोडवे यांचा सन्मान करताना पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार.

मंगळवारी (ता. एक) सायंकाळी साडेसातला नांदेड उत्तरचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्या घराजवळील स्टेट बँकेसमोर उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाने अचानक पेट घेतला. घटनास्थळी लोकांची गर्दी जमली होती; परंतु कोणीही मदतीसाठी पुढे आले नाही. या वेळी सहायक पोलिस उपनिरीक्षक खोडवे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न लावता आजूबाजूच्या बेकरी व घरांतून बकेटमध्ये पाणी आणून आगीवर नियंत्रण मिळवले. विशेष म्हणजे, अनेक लोक आग पाहत होते, काही मोबाइलवर शूटिंग करत होते. मात्र, खोडवे यांनी दाखविलेले धाडस व तत्परता कौतुकास्पद ठरले. त्यांच्या प्रयत्नांमुळे मोठा अनर्थ टळला. यापूर्वीही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावून पोलिस दलाचा लौकिक वाढवला आहे. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी खोडवे यांचा सन्मान करताना त्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. अपर पोलिस अधीक्षक खंडेराव धरणे, सूरज गुरव आणि गृह पोलिस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनीही खोडवे यांच्या कार्याची प्रशंसा केली.

दै. पुण्यनगरी दि. 01.01.2025

# पोलिस अधीक्षकांनी केले सुधीर खोडवे यांना सन्मानित

**नांदेड / प्रतिनिधी**

मालेगाव रोडवर उभ्या असलेल्या कारला आग लागल्याचे निदर्शनास आल्यानंतर घटनास्थळावरून निघून न जाता सुट्टीवर असतानाही कर्तव्य बजावत ती आग विझवणारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुधीर खोडवे यांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बक्षीस देऊन सन्मानित केले आहे.



दि. १० डिसेंबर रोजी सहायक फौजदार सुधीर खोडवे हे नांदेड शहरातून मालेगावकडे जात होते. याचवेळी आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या निवासस्थानाजवळील स्टेट बँकेसमोर उभ्या असलेल्या एका कारने पेट घेतला होता. यावेळी तेथे उपस्थित असलेले नागरिक ती आग विझवण्याऐवजी व्हिडीओ शुटींग करीत होते. ही बाब लक्षात येताच परिस्थितीचे गांभीर्य ओळखून खोडवे यांनी आपले वाहन थांबवून बाजूला असलेल्या बेकरीतून बकेटमध्ये पाणी आणून आग नियंत्रणात आणली.

एका कर्तव्यदक्ष पोलीस दलातील कर्मचाऱ्यामुळे आगीत राख होणारी कार वाचली. मोठा अनर्थही टळला. यापूर्वीही सपोउपनिरीक्षक खोडवे यांनी पोलीस दलात उत्तम कामगिरी केली आहे. त्यांच्या या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, सुरज गुरव, गृह पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनीही खोडवे यांचे कौतुक केले आहे.